देशदूत
My जळगाव
। सोमवार, दि. १५ जुलै २०२४ । पान ६ ।



### कंजरवाडासह काही घरांमध्ये शिरले पाणी, कॉलनीला पाण्याचा वेढा

# धुवाँधार पावसामुळे रस्त्यांवर पाणीच पाणी

जळगाव । प्रतिनिधी

गेल्या अनेक दिवसांपासून दडी मारलेल्या पावसाने मध्यरात्री ३ वाजेच्या सुमारास हजेरी लावली. रात्रभर झालेल्या धुवाँधार पावसामुळे बहुतांश कॉलनी, नगरांच्या परिसरातील रस्त्यांवर पाण्यांचा लोंढा वाहू लागला आहे. तर सिंधी कॉलनीजवळील कंजरवाडा परिसरासह काही भागातील घरांमध्ये पाणी शिरले. तसेच आव्हाने खेडी परिसरात आदिवासी महिलेच्या घरात पाणी घुसल्याची घटना समोर आली आहे. शनिवारी दिवसभर ढगाळ वातावरण होते. रात्री ३ वाजेच्या सुमारा वाऱ्यासह पावसाने जोरदार हजेरी लावली. विजांच्या कडकडाटासह धुवाँधार पावसामुळे रस्त्यांवर गुडघाभर पाणी आले आहे. तसेच सखल भागात पाणी साचल्याने स्त्यांवर पाण्यांचा लोंढा वाहू लागल्याचे चित्र होते. रविवारी रात्री ३ ते दुपारी १२ वाजेपर्यंत पावसाची संततधार सुरु असल्याने नदी-नाल्यांना पुर आला असून गटारी देखील ओसंडून वाहू लागल्याचे चित्र होते. रात्रभर झालेल्या धुवाँधार पावसामुळे पत्र्याच्या घरांवर टाकलेला प्लॉस्टिकचा कागदही काम करीत नसल्याने पत्र्याच्या गळती लागल्याने घरात पाण्याचे भांडे ठेवून रात्र काढावी लागल्याचे नागरिकांनी सांगितले. दरम्यान,शहरातील सिंधी कॉलनीजवळील कंजरवाडा परिसरात घरांमध्ये रात्री पाणी शिरले. तसेच आव्हाने खेडी परिसरात आदिवासी महिलेच्या घरात पाणी घुसल्याने त्यांचा संसार उघड्यावर आल्याची व्यथा नागरिकांनी मांडली.



### मनपा प्रशासनाविरोधात कुंभकर्ण आंदोलन

सिंधी कॉलनी ते पांडे चौक रोडवरील कंजरवाडा परिसर असून रस्त्यावरुन पाणी जाण्यासाठी मार्गच नसल्याने घरात पाणी शिरले.तरी देखील महापालिका प्रशासन लक्ष देत नाही. महापालिके दुर्लक्ष होत असल्याने महापालिका प्रशासनाच्या विरोधात रस्त्यावर खाट टाकून राहुल नेतलेकर यांच्यासह काही युवकांनी कुंभकर्ण आंदोलन केले.

### सोनीनगर-सावखेडा रोडवर साचले तलाव

पिंप्राळा परीसरातील सोनी नगर-सावखेडाकडे जाणाऱ्या रोडवर चैतन्य किराणा दुकाना समोर नाल्याचे सांडपाणी रस्त्यावर साचल्याने तलाव सारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. पाण्यातून वाहुन येणारे सर्प नागरिकांच्या घरात येत असल्याने महिलांच्या मनात भिती निर्माण झाली आहे. या रस्त्याच्या कामाचा आमदार राजूमामा भोळे यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला होता. ठेकेदाराने रस्त्यावर खडी टाकुन ठेवली आहे. मात्र, काम का रखडले नागरिकांना प्रश्न पडला आहे. या तलावातून वाहन चालकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. प्रत्येक पावसात सावखेडा, सोनी नगर, बाबुराव नगर, श्रीराम नगर, ओंकार पार्क, गणपती नगरातील नागरिकांना याचा त्रास सहन करावा लागत आहे. सावखेडा रस्ता मंजूर झाला असून रस्त्यावर खडी पण टाकुन ठेवली आहे. मात्र, काम अपुर्ण सोडून दिल्याने नागरिकांना कसरत करावी लागत आहे. सदरचे काम त्वरीत सुरु करण्यात यावे अशी मागणी परीसरातील नागरीकांनी केली आहे. दरम्यान, आझादनगर हुडकोकडुन मोठा नाल्याचे सांडपाणी सोनी नगरातील रहिवासी विनोद निकम यांच्या घरात शिरले होते.तसे शहरातील राजारामनगर परिसरात रात्री झालेल्या पावसामुळे या कॉलनीला पाण्याचा वेढा असल्याने नागरिकांना घराबाहेर पडणे देखील कठीण झाले होते.

## कार झाडावर आदळली : तरुणाचा मृत्यू, तिघे गंभीर

### शिरसोली रस्त्यावरील घटना


जळगाव । प्रतिनिधी

मित्रांसोबत हॉटेलमधून जेवण करून घरी कासमवाडी येथे परतत असताना कार झाडावर आदळल्याने एकाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना रविवार दि. १४ जुलै रोजी दुपारी ४ वाजता घडली. या अपघातात इतर ३ जण गंभीर जखमी झाले असून त्यांना खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस स्टेशनला घटनेची नोंद करण्याचे काम सुरू होते.



मयत आनंदा सोनवणे

आनंदा शांताराम सोनवणे (वय-३९ रा. कासमवाडी, जळगाव) असे मयत तरुणाचे नाव आहे. कासमवाडी परिसरात आनंदा सोनवणे हे दोन भाऊ, आई-वडील, पत्नी, दोन मुलांसह वास्तव्याला होते. सामाजिक कार्यकर्ता म्हणून ते ओळखले जात. मित्र भैरव भगवान राणे, प्रवीण आढाव, योगेश रेंभोटकर यांच्यासोबत कारने शिरसोली गावाजवळील एका हॉटेलात जेवण करण्यासाठी गेले होते.



जेवण आटोपून कासमवाडी येथे येण्यासाठी निघाले असता गुलाबराव देवकर कॉलेजच्या पुढे एका झाडावर त्यांची कार आदळली. या अपघातात आनंदा सोनवणे यांचा जागीच मृत्यू झाला तर त्याच्यासोबत असलेले भैरव राणे, प्रवीण आढाव, योगेश रेंभोटकर हे गंभीर जखमी झाले. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर जिल्हा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात मित्रपरिवार व नातेवाईकांनी गर्दी केली होती. या अपघातातील जखमी प्रवीण आढाव हे देशदूतच्या डिटीपी तर योगेश रेंभोटकर हे जाहिरात विभागातील सहकारी आहेत.

## अपयशाने खचू नका, स्वयंप्रेरित व्हा!

### गुणगौरव सोहळ्यात अभियंता कल्याणी पाटील यांचे प्रतिपादन



जळगाव । प्रतिनिधी

जेवढे पर्याय शोधून त्यातून यशस्वी मार्ग काढा. सर्वोत्तम होण्याचा प्रयत्न करा तसेच एकांतात एकाग्र होऊन अभ्यास करा. अपयशाने खचू नका, स्वयंप्रेरित व्हा आणि स्वतः परिश्रम करण्यासाठी प्रेरित रहा. तसेच प्रयत्न करणे सोडू नका, असे प्रतिपादन कनिष्ठ अभियंता कल्याणी पाटील यांनी केले.

सरदार वल्लभभाई पटेल बहुउद्देशीय विकास संस्था जळगाव, रोटरी क्लब ऑफ जळगाव सेंट्रल, युवा विकास फाउंडेशन जळगाव व विष्णू भंगाळे मित्र परिवार आयोजित यशवंत गुणगौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात दहावी उत्तीर्ण व बारावी उत्तीर्ण असलेल्या १५३० विद्यार्थ्यांचा सन्मान या कार्यक्रमात करण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून माजी पालकमंत्री गुलाबराव देवकर, काँग्रेस प्रदेश उपाध्यक्ष प्रतिभा शिंदे, आय.एम.ए.जळगाव माजी अध्यक्ष डॉ.ए.जी.भंगाळे, प्रदेश युवा सरचिटणीस धनंजय चौधरी, डॉ.राजेश पाटील, शिवसेना जिल्हाप्रमुख विष्णू भंगाळे, वाल्मिक पाटील, प्राचार्य. डॉ.प्रशांत वारके, अनिल झंवर, डॉ.इंदिरा पाटील, डॉ.सागरमल डाकलिया, रजनीश पारधीस, अध्यक्ष रोटरी क्लब ऑफ जळगाव सेंट्रल रो.दिनेश थोरात, रो.समर्थ पाटील, ग.स.सोसायटी संचालक महेश पाटील, पियुष गांधी आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरवात महापुरुषांच्या प्रतिमेस माल्यार्पण व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. प्रास्ताविक विष्णू भंगाळे यांनी केले. प्राचार्य डॉ. प्रशांत वारके आपला मुलगा प्रेषित वारके याला जेईई या परीक्षेत कुठलाही क्लास न लावता यश कसे मिळवता आले याचे गुपित सांगितले. प्रेषित वारके व तनय डाकलिया यांनी मनोगत व्यक्त केले.सूत्रसंचालन गणेश लोडते व राहूल चौधरी यांनी केले. यशस्वीतेसाठी महेंद्र पाटील, राजेश वारके, रवींद्र रडे, शैलेश काळे, प्रवीण पाटील, प्रा.डॉ. अतुल इंगळे, प्रा. डॉ.हेमराज पाटील, नेमीचंद येवले, अमोल मोरे, मोहित पाटील, चेतन पाटील, ऋषिकेश सोनवणे, शुभम निकम, सचिन पाटील, गिरीश कोल्हे, मोहित नेमाडे, सुदर्शन पाटील, निलेश जोशी, पंकज जोशी, प्रदीप भोई, अजित चौधरी, विकी काळे यांनी परिश्रम घेतले.

## धावत्या रेल्वेतून पडल्याने परप्रांतीय तरुणाचा मृत्यू

**जळगाव ।** येथील जळगावच्या रेल्वे स्थानकाजवळील फलाट क्रमांक ३ जवळ धावत्या रेल्वेतून पडल्याने एका ३० वर्षीय परप्रांतीय तरूणाचा मृत्यू झाल्याची घटना शनिवारी दि. १३ जुलै रोजी सायंकाळी ७ वाजेच्या सुमारास घडली आहे. याप्रकरणी रामानंद नगर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

रोशन भोलाराम (वय २९, रा. नागोर जिल्हा, राजस्थान) असे मयत तरुणाचे नाव आहे. त्याच्या पश्चात वडील, ३ भाऊ, पत्नी असा परिवार आहे. एक वर्षापूर्वीच त्याचे लग्न झाले आहे. रावेर तालुक्यातील सावदा येथे एका ठेकेदारासोबत तो कामानिमित्त आला असल्याची माहिती मिळत आहे. जळगाव रेल्वेस्थानकावरील फलाट क्रमांक तीनजवळ डाऊन रेल्वे मार्गावर खांबा क्रमांक ४१५/२७ जवळ एक तरुण पडलेला असल्याची माहिती मालगाडी चालकाने शनिवारी दि. १३ जुलै रोजी सायंकाळी ७ वाजता दिली. त्यानंतर लोहमार्ग पोलिस दलाचे पोहेकॉ सचिन भावसार व त्यांच्या सहकाऱ्यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली. मृतदेह शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात दाखल करण्यात आला. तेथे वैद्यकीय अधिकारी यांनी मयत घोषीत केले. सुरुवातीला तो अनोळखी म्हणून पोलिसांनी तपास सुरु केला.

## विद्यार्थ्यांनी ध्येयाने प्रेरित होवून अभ्यास करावा!

**उपक्रम...**

### साहित्य वाटपप्रसंगी पालकमंत्री गुलाबराव पाटील यांचे प्रतिपादन

जळगाव । प्रतिनिधी

अॅड. बबन बाहेती यांच्या संकल्पनेतून सुरु झालेला उपक्रम आजही पदाधिकाऱ्यांनी चालू ठेवला ही गौरवास्पद बाब असल्याचे सांगून आपल्या अवती भोवतीचे कोणतेही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नयेत याची काळजी प्रत्येकानेच घेतली पाहिजे.



श्याम कोगटा व रोहन बाहेती यांच्या पुढाकाराने अनेक वर्षांपासून गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटपाचा कार्यक्रम हा एक स्तुत्य उपक्रम असून विद्यार्थ्यांनी ध्येयाने प्रेरित होवून अभ्यास करावा, यश तुमच्या हातात आहे, असे प्रतिपादन पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी केले. अॅड. बबन बाहेती प्रतिष्ठान व कांताई फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शालेय साहित्य वाटप कार्यक्रमात ना. पाटील बोलत होते. या कार्यक्रमाला आमदार राजूमामा भोळे, नगरसेवक मनोज चौधरी, गणेश सोनवणे, नितीन बरडे, क्रीडा रसिक एजुकेशन सोसायटीचे सचिव अॅड रोहन बाहेती, क्रीडा संचालक प्रा.सतीश कोगटा, प्राचार्य अनिल लोहार, माजी सभापती जनार्दन कोळी, उद्योजक रजनीकांत शहा, महेंद्र कोठारी, संतोष पाटील, अॅड. रोहन बाहेती, बाहेती प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्याम कोगटा, माजी नगरसेवक राजू मोरे, पवन ठाकूर, विजय पाटील, विशाल निकम, किरण राजपूत यांच्यासह पालक व विद्यार्थी मोठ्या संखेने उपस्थित होते. बबन बाहेती महाविद्यालयात दरवर्षाप्रमाणे सुमारे ५ हजार विद्यर्थ्यांना पालकमंत्री गुलाबराव पाटील व आ. राजूमामा भोळे यांच्या हस्ते आवश्यक शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.

जळगाव येथील बबन बाहेती महाविद्यालय येथे पार पडलेल्या या शैक्षणिक साहित्य वाटपावेळी विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे किट देण्यात आले. यावेळी विद्यर्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात बाहेती प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्याम कोगटा यांनी कार्याक्रिमाची सविस्तर माहिती विषद केली. सूत्रसंचालन राजेश जाधव यांनी केले. आभार नगरसेवक मनोज चौधरी यांनी मानले.

## संत हराळे वैष्णव समाज संस्थेतर्फे वृक्षारोपण



जळगाव । प्रतिनिधी

संत हराळे वैष्णव समाज बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने वृक्षारोपण करण्यात आले. जळगांव खेडी शिवारातील माऊली नगरच्या ओपन स्पेसमध्ये अध्यक्ष ज्ञानदेव भारुळे यांच्या हस्ते व संचालकांनी वृक्षारोपण केले. या सामाजीक व पर्यावरण पूरक उपक्रम सातत्याने गेल्या तीन वर्षांपासून संस्था राबवीत आहे. लिंब,चिंच,गुलमोहर, औदुंबर,पिंपळ, वड,जांभुळ अशा भरपूर रोपांची लागवड करण्यात आली. या कार्यक्रमास उपाध्यक्ष टी.जी.भारुळे, संचालक मयूर भारुळे, कमलाकर ठोसर, साहील ठोसर व संजय बोंडे यांची उपस्थिती होती.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार सचिव लीलाधर भारुळे यांनी केले.

cmyk